मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह रावेर जि. जळगाव या वसतीगृहाच्या इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: बीसीएच-२०१८/प्र.क्र.२०१/बांधकामे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २२ जुलै, २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२००७/ प्र.क्र.३०/ मावक-४, दि.२४.०३.२००७.
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२००५/ प्र.क्र.५५४/ मावक-४, दि.२८.०६.२००७.
३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२००९/ प्र.क्र.२५/ मावक-७, दि.२०.०३.२००९.
४) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. सकआ/शिक्षण/मुलांचे शावगृ/ जळगाव/सुधा.अंदा/का-५/२०१८-१९/२२९९, दि. १३/६/२०१९.

प्रस्तावना :-

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा व तालुका स्तरावर मागासवर्गीय मुला-मुलींसाठी १०० विद्यार्थी क्षमतेची नवीन १०० शासकीय वसतीगृहे तसेच विभागीय ठिकाणी १००० विद्यार्थी क्षमतेची ७ (२५० क्षमतेची प्रत्येकी ४ अशी एकूण २८) सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या शासकीय वसतिगृहाच्या इमारत बांधकामासाठी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक बांधकाम, अमरावती यांनी प्रतिरूप आराखडा तयार केला असून शासकीय प्रत्येकी वसतिगृहाच्या इमारत बांधकामाचा नकाशे रू.३,९६,९२,५००/- (अक्षरी रूपये तीन कोटी शहान्नव लक्ष ब्यान्नव हजार पाचशे फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास शासन निर्णय दि.१७.०२.२००७ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह रावेर जि. जळगाव येथील सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा रू.५५५.१३ लक्ष इतक्या रकमेचा प्रस्ताव संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये आयुक्त समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी शासनास सादर केला आहे. सदरील प्रस्ताव तांत्रिक बाबींची छाननीकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविण्यात आला असता, सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणीत केल्यानुसार रू.५५५.१३ लक्ष इतक्या रकमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दर्शविली आहे. त्यानुषंगाने मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह रावेर जि. जळगाव या वसतिगृहाच्या अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी मागासवर्गीय मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह रावेर जि. जळगाव या वसतीगृहाच्या इमारत बांधकामाचे सुधारित प्रशासकीय

मान्यतेचे रुपये ५,५५,१३,०००/- (रुपये पाच कोटी पंचावन्न लक्ष तेरा हजार फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे पाठविले होते. सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केल्यानुसार मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह रावेर जि. जळगाव या वसतिगृह बांधकामास रुपये ५,५५,१३,०००/- (रुपये पाच कोटी पंचावन्न लक्ष तेरा हजार फक्त) इतक्या रकमेस खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. सदर काम सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेल्या रकमेतच पुर्ण करणे अनिवार्य राहिल.
२. तांत्रिक मान्यता देण्यापुर्वी अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्याचे साक्षांकन घेण्यात यावे.
३. मुळ प्रशासकीय मान्यता आदेशातील अटी व शर्तीचे काटेकोर पालन करण्यात यावे.
४. सदर काम मुळ निविदेतूनच करण्यात यावे.

२. सदर मागासवर्गीय मुलींच्या वसतीगृहाच्या इमारत बांधकामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त करुन, विहित नियमानुसार अटी व शर्ती निश्चित करुन ई-निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग जळगाव यांनी तात्काळ करावी.

३. या वर होणारा खर्च मागणी क्र. एन-४, मुख्य लेखाशिर्ष ४२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च, २७७-शिक्षण, पंचवार्षिक योजनां अंतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (०३) मागासवर्गीय मुलांमुलींसाठी शासकीय वसतीगृह बांधणे (४२२५ ०४८१), ५३-मोठी बांधकामे या लेखाशीर्षाखाली खर्ची घालून तो सन २०१९-२० या वित्तीय वर्षात करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा.

४. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, जळगाव यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारीक क्र.२५३/१९/ इमा-२, दि.१२/६/२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०७२२१५१४४३००२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2019.07.22 15:20:30 +05'30'

(अ. कों. आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, समाजकल्याण, पुणे
२) उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई-३२.
३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे/नाशिक

४) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगाव.
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग, जळगाव
६) महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा / लेखाअनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
७) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नाशिक.
८) सहायक आयुक्त, समाजकल्याण, जळगाव
९) जिल्हा कोषागार अधिकारी, जळगाव.